International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# बंजारा बोलीभाषेचा भाषाशास्त्रीय अभ्यास : एक समाजभाषावैज्ञानिक दृष्टिकोन

**डॉ. सुभाष राठोड**

*मराठी विभाग, (कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक)*

*रयत शिक्षण संस्थेचे, नारायणराव सणस विद्यालय व वसंतराव सखाराम सणस ज्युनिअर कॉलेज, वडगाव खुर्द, पुणे.*

*Corresponding Author – डॉ. सुभाष राठोड*

**DOI - 10.5281/zenodo.18654162**

**सारांश (Abstract):**

*भारताच्या बहुभाषिक परंपरेत बोलीभाषा सामाजिक व सांस्कृतिक अभिव्यक्तीचे महत्त्वपूर्ण माध्यम आहेत. बंजारा समाजाची बंजारा / गोरबोली (गोरमाटी) ही इंडो-आर्यन भाषाकुटुंबातील एक प्राचीन, स्वतंत्र आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध बोलीभाषा असून ती प्रामुख्याने मौखिक परंपरेतून आजपर्यंत जतन झाली आहे. ऐतिहासिक स्थलांतर आणि फिरस्ता जीवनपद्धतीमुळे ही बोली भारताच्या उत्तर, मध्य व दक्षिण भागांत पसरली असून, तिच्यावर राजस्थानी, मराठी, हिंदी, गुजराती, कन्नड व तेलुगू भाषांचा काही प्रमाणात प्रभाव दिसून येतो; तथापि तिची मूलभूत व्याकरणरचना, ध्वनिसंरचना आणि शब्दसंग्रह सर्वत्र तुलनेने समान राहिला आहे.*

*बंजारा बोली विविध प्रदेशांत गोरमाटी, लंबाडी, लमाणी, लभाणी व तांडाभाषा अशा नावांनी ओळखली जाते. लोकगीत, लोककथा, म्हणी, भजने आणि लोकवाङ्मयाच्या माध्यमातून तिचे संवर्धन झाले असून, या प्रक्रियेत तांड्यातील माता-भगिनींचे योगदान विशेष महत्त्वाचे ठरले आहे. भाषाशास्त्रीय दृष्ट्या महाप्राण उच्चार, मूर्धन्य वर्णांचा वापर, नासिक्य ध्वनी, 'ळ'काराचे प्राबल्य, ओ-कारान्त शब्दरचना व स्वतंत्र शब्दसंपदा ही गोरबोलीची वैशिष्ट्ये आहेत. जागतिकीकरण व शहरीकरणामुळे या बोलीसमोर आव्हाने उभी असली, तरी शैक्षणिक संशोधन, साहित्यनिर्मिती व डिजिटल माध्यमांमुळे तिच्या जतन-संवर्धनाच्या शक्यता बळावत आहेत.*

***बीज-शब्द (Keywords): बंजारा बोलीभाषा, गोरबोली, गोरमाटी, बंजारा समाज, लोकभाषा, समाजभाषाविज्ञान, इंडो-आर्यन भाषाकुटुंब, राजस्थानी भाषाशाखा, मौखिक परंपरा, लोकवाङ्मय, भाषिक विविधता, बोलीभाषेचे संवर्धन, भाषिक अस्मिता, सांस्कृतिक वारसा, भाषिक स्थलांतर, बोलीभाषा अभ्यास, भाषिक संपर्क, लुप्तप्राय भाषा, भारतीय बहुभाषिकता.***

**प्रस्तावना (Introduction) :**

आपला भारत देश बहुभाषिक आहे. भारतात प्रचंड सांस्कृतिक विविधता असल्याने अनेक भाषा बोलल्या व लिहिल्या जातात. यामध्ये बोलीभाषांचा देखील मोठा सहभाग आहे. मात्र या बोलीभाषांचे लिखित स्वरूप फार कमी प्रमाणात उपलब्ध आहे. काही भाषा फक्त बोलल्या जातात, त्यांना स्वतःची लिपी नसल्यामुळे किंवा भाषाशास्त्रीय अभ्यास, सर्वेक्षण न झाल्यामुळे त्या बोलीभाषांमध्ये लिखित साहित्य जवळजवळ नाही.

जर अशा बोलीभाषेत साहित्य लिहायचे असेल, तर बहुतेक वेळा ते स्थानिक राज्यभाषेत किंवा देवनागरी लिपीत केले जाते. यामुळे अनेक अडचणी निर्माण होतात आणि अशा बोलीभाषांमध्ये लिखित साहित्य फारसे तयार होत नाही. अलिकडे काही लोकभाषा त्यांच्या संबंधित

प्रांतिक भाषेच्या लिपीत लिहिल्या जात आहेत, ज्यामुळे त्या बोलीभाषांचे लोकसाहित्य हळूहळू लिखित स्वरूपात उपलब्ध होत आहे.

गोरबंजारा समाजाची गोरमाटी तथा गोरबोली, बंजारा बोली ही अशाच प्रमुख बोलीभाषांपैकी एक आहे. ही पूर्णपणे मौखिक स्वरूपाची आहे. 'गोरमाटी' तथा 'गोरबंजारा' समाज हा डोंगराळ भागात विखुरलेल्या, निसर्गाच्या सान्निध्यात राहणाऱ्या, शहर–महानगरांपासून दूर असलेल्या, स्वतंत्र राहणीमान व स्वतंत्र बोलीभाषा असणारा प्रमुख लोकगण आहे.

गोरवंशीय गोरबंजारा समाजाची ही स्वतंत्र बोलीभाषा "बंजारा भाषा", "गोरबोली" किंवा "गोरमाटी बोली" म्हणून ओळखली जाते. भारतभरात अनेक बोलीभाषा निर्माण झाल्या, त्यातील काही विलुप्त झाल्या, परंतु गोरबंजारा गोरबोली भाषा आपल्या आगळ्यावेगळ्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांमुळे आजही टिकून आहे. संपूर्ण भारतभरात एकसारखी आढळणारी ही गोरबोली गोरबंजारा समाजाचे सांस्कृतिक वैभव अधोरेखित करते.

**साहित्य समीक्षा : (Review of Literature):**

**बंजारा बोलीच्या उत्पत्तीविषयी अभ्यासकांतील मत-मतांतरे :**

गोरबोलीचा सखोल आणि बारकाईने विचार केला असता, तिच्या भाषिक रचनेवरून असे स्पष्ट होते की ही बोली इंडो–आर्यन भाषाकुळातील एक प्राचीन बोलीभाषा आहे. बंजारा बोलीच्या उत्पत्तीच्या दृष्टीने विचार केल्यास तिचा राजस्थानी भाषेशी निकटचा आणि ऐतिहासिक संबंध दिसून येतो. राजस्थानी भाषेच्या विविध बोलींपैकी विशेषतः माळवी बोलीचा प्रभाव बंजारा गोरबोलीवर अधिक प्रमाणात जाणवतो. तथापि, बंजारा बोलीच्या उत्पत्तीविषयी अभ्यासकांमध्ये एकमत नसून विविध विद्वानांनी वेगवेगळी मते मांडलेली आहेत. ती मते पुढीलप्रमाणे आहेत—

१. **डॉ. जॉर्ज अब्राहम गियर्सन:**

डॉ. गियर्सन यांनी आपल्या सुप्रसिद्ध ग्रंथ 'The Linguistic Survey of India' मध्ये असे नमूद केले आहे की, बंजारा (लमाणी) ही एक भ्रमणशील बोली असून ती राजस्थानी भाषेचे पश्चिमी रूप आहे. त्यांच्या मते, बंजारा समाजाच्या स्थलांतरशील जीवनपद्धतीमुळे या बोलीचे स्वरूप स्थिर न राहता विविध भाषिक प्रभाव स्वीकारत गेले आहे.

२. **डॉ. भोलानाथ तिवारी:**

डॉ. भोलानाथ तिवारी यांनी आपल्या 'भाषाविज्ञान' या ग्रंथात गोरबोलीचा संबंध जिप्सी (रोमणी) भाषेशी जोडलेला आहे. या संदर्भातील त्यांचे मत पुढीलप्रमाणे आहे:

"जिप्सी घुमंतू लोगोंद्वारा प्रयुक्त एक भाषा, जिसे हबुडी, रोमणी, बंजारा तथा बंजारी आदि भी कहते हैं। जिप्सी भाषाएँ मूलतः यूरोपीय परिवार की हैं। पाँचवीं सदी ई.पू. में इन जिप्सी भाषियों के पूर्वज जहाँ-तहाँ फैल गए। इनके कुछ वर्ग भारत के बाहर चले गए और कुछ भारत में विभिन्न प्रदेशों में बस गए। इस प्रकार उनकी भाषा मूलतः पाँचवीं सदी ई.पू. की प्राकृत भाषा से संबद्ध है।"

या मतानुसार, गोरबोलीची मुळे प्राचीन प्राकृत भाषांमध्ये आढळतात आणि तिचा ऐतिहासिक प्रवास जिप्सी समाजाच्या स्थलांतराशी संबंधित आहे.

३. **प्रा. मोतीराज राठोड :**

प्रा. मोतीराज राठोड यांनी गोरबोलीच्या उत्पत्तीविषयी पुढील मत मांडले आहे—

"संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश और उनमें से शौरसेनी अपभ्रंश से गोरबोली का निर्माण हुआ होगा। किसी भी बोली की उत्पत्ति समझने के लिए उसके मूलस्थान और भू-क्षेत्र का

अध्ययन आवश्यक होता है। उस क्षेत्र की प्रमुख भाषा और उपभाषाओं का प्रभाव संबंधित बोली पर स्पष्ट दिखाई देता है। गोरबंजारा बोली पर राजस्थानी डिंगल–पिंगल और मारवाड़ी भाषा का प्रभाव है। गोरवंशीय लोगों का लंबे समय तक पहाड़ी क्षेत्रों में निवास रहा। ये क्षेत्र मालवा और निमाड़ के समीप होने के कारण मारवाड़ी, गुजराती तथा अन्य सीमावर्ती भाषाओं का प्रभाव गोरबोली पर पड़ा है।"

प्रा. मोतीराज राठोड यांच्या मते, शौरसेनी अपभ्रंशापासून गोरबोलीची उत्पत्ती झाली असावी. गोरबोलीचे मूलस्थान राजस्थान असून, तेथील मारवाडी, माळवी, नेमाडी तसेच सीमावर्ती गुजराती भाषांचा प्रभाव तिच्यावर प्रकर्षाने दिसून येतो.

**४. डॉ. प्रेमप्रकाश रस्तोगी:**

डॉ. प्रेमप्रकाश रस्तोगी यांनी बंजारा बोलीला राजस्थानी भाषेचीच एक उपबोली मानले आहे.

**५. हिरालाल शुक्ल:**

हिरालाल शुक्ल यांनी आपल्या 'जनभाषा और साहित्य' (पृ. १४०) या ग्रंथात बंजारा बोलीला आर्य भाषा परिवारातील एक स्वतंत्र बोली म्हणून मान्यता दिली आहे.

**६. राहुल सांकृत्यायन :**

राहुल सांकृत्यायन यांनी आपल्या 'घुम्मकडशास्त्र' (पृ. ४६) या ग्रंथात बंजारा बोली ही राजस्थानी बोलीच आहे, असे स्पष्ट मत मांडले आहे.

वरील सर्व मतांचा समग्र विचार करता, बहुतांश अभ्यासकांनी बंजारा बोलीला राजस्थानी भाषेचेच एक रूप मानलेले दिसते. "चार कोस पर बदले पानी, दस कोस पर बदले बानी" या लोकसिद्ध नियमानुसार बंजारा समाजाचा सातत्याने फिरस्ता जीवनक्रम राहिल्यामुळे भारतातील विविध बोलीभाषांचा प्रभाव गोरबोलीवर पडलेला आढळतो. महाराष्ट्रात मराठी, गुजरातमध्ये गुजराती, राजस्थानात राजस्थानी, मध्यप्रदेशात हिंदी, कर्नाटकात कन्नड, आंध्र–तेलंगणामध्ये तेलुगु अशा अनेक भाषांतील शब्द बंजारा बोलीने आत्मसात केले आहेत. भटकंतीमुळे बंजारा बोलीत केवळ भारतीय भाषाच नव्हे, तर काही प्रमाणात देश–विदेशी भाषांतील शब्दसुद्धा आढळतात.

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of the Study):**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून बंजारा बोलीभाषेचा भाषाशास्त्रीय व समाजभाषावैज्ञानिक दृष्टिकोनातून सखोल अभ्यास करण्याच्या दृष्टीने पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. बंजारा – गोरबोली या बोलीभाषेचे भाषाशास्त्रीय स्वरूप अभ्यासणे.
२. बंजारा बोलीचा समाजभाषावैज्ञानिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे.
३. बंजारा बोलीच्या उत्पत्तीविषयी अभ्यासकांची मते जाणून घेणे.
४. बंजारा बोलीच्या व्याकरणिक व ध्वन्यात्मक वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.
५. बंजारा बोलीची सद्यःस्थिती अभ्यासणे.
६. बंजारा बोलीच्या जतन व संवर्धनाची गरज अधोरेखित करणे.

**मुख्य मांडणी / विश्लेषण (Main Discussion / Findings and Analysis) :**

**१) बंजारा बोलीभाषेचा परिचय, महत्त्व :**

बंजारा / गोरबोली ही भारतीय भाषापरिवारातील एक महत्त्वपूर्ण, स्वतंत्र आणि प्राचीन बोली आहे जी गोर बाजारा समाजाची सांस्कृतिक ओळख दर्शवते. भारतातील बंजारा समाजाची मातृभाषा 'बंजारी, 'गोरमाटी' किंवा 'गोरबोली' म्हणून ओळखली जाते. भाषिक दृष्ट्या ही भाषा इंडो-आर्यन भाषाकुटुंबातील असून पश्चिम राजस्थानी

शाखेशी, विशेषतः मारवाडी व मेवाडी बोलीशी तिची जवळची नाळ आहे. बंजारा बोलीभाषा ही फक्त संवादाचे साधन नाही, तर बंजारा समाजाच्या अनंत प्रवासाचा, त्याच्या परिश्रमाचे आणि संस्कृतीच्या शतकानुशतके जपलेल्या अनुभवांचे अमूल्य सांस्कृतिक ठेवा आहे. भौगोलिक विस्तारामुळे या भाषेला प्रदेशपरत्वे गोरमाटी, गोरबोली, लमानी, लंबाडी, लभाणी किंवा बंजारी अशा विविध नावांनी ओळखले जाते; तरीही समाजातील लोक स्वतःच्या मातृभाषेचा अभिमान म्हणून तिचा उल्लेख 'गोरमाटी' म्हणूनच अधिक प्रमाणात करतात. बंजारा बोलीभाषा ही बंजारा समाजाचा आत्मा आहे. ती त्यांच्या अस्मितेची जिवंत ओळख असून पिढ्यान्पिढ्या जपलेली संस्कृतीची तेजस्वी प्रतिमा आहे. या भाषेत समाजाचे इतिहास, परंपरा, लोककला आणि जीवनमूल्ये गुंफलेली आहेत. बंजारा बोली ही केवळ संवादाचे साधन नसून ती त्यांच्या सांस्कृतिक वारशाची अमूल्य शिदोरी आहे, जी आजही समाजाला एकत्र बांधून ठेवते आणि त्यांच्या अस्तित्वाला उज्ज्वलतेने प्रकाशित करते.

भौगोलिक विस्तारामुळे बंजारा बोलीभाषेवर प्रादेशिक भाषांचा लक्षणीय प्रभाव जाणवतो. राजस्थान व मध्य प्रदेशातल्या बंजारा समाजाच्या बोलीवर राजस्थानी व मालवी भाषेची छाप स्पष्ट दिसते. महाराष्ट्रात मराठी भाषेचा विपुल शब्दसंग्रह आढळतो, तर दक्षिण भारतात (तेलंगण, आंध्र प्रदेश, कर्नाटक) तेलुगू व कन्नडचा प्रभाव जाणवतो. मात्र असा प्रादेशिक प्रभाव असूनही, गोरमाटीचे मूळ व्याकरण आणि शब्दसंग्रह अखंड राहिला आहे; त्यामुळे भिन्न प्रदेशांतील बंजारा व्यक्ती सहज संवाद साधू शकतात. हा बहुभाषिक संघर्ष आणि सामंजस्याचा अद्वितीय अनुभव या भाषेतून प्रकट होतो.

बंजारा बोलीभाषेची मौखिक परंपरा प्राचीन आणि समृद्ध आहे. या भाषेचे जतन लिखित स्वरूपापेक्षा मौखिक परंपरेतून अधिक झाले आहे. लोकगीते, पारंपरिक लेंगीगीते, भजने आणि लोककथा या भाषेच्या प्रजननाचे माध्यम राहिल्या आहेत. प्रत्येक गाणे, प्रत्येक कथा ही पिढ्यानु पिढ्या भाषेचे संवर्धन करते. बंजारा बोलीभाषा लिहिण्यासाठी मुख्यतः देवनागरी लिपीचा वापर केला जातो, तर दक्षिण भारतात स्थानिक लिपींमध्ये (तेलुगू किंवा कन्नड) गोरमाटी लिहिली जाते. अलीकडच्या काळात काही अभ्यासकांनी स्वतंत्र लिपी विकसित करण्याचे प्रयत्न केले, तरी अद्याप ती व्यापक प्रमाणात स्वीकारली गेली नाही.

साहित्यिक दृष्ट्या बंजारा समाजाचा वारसा जरी लिखित स्वरूपात कमी असला, तरी त्याचा मौखिक ठेवा अत्यंत संपन्न आहे. संत सेवालाल महाराजांच्या वचनांमधून तसेच लोककथांमधून भाषा जिवंत आहे. कथासंग्रह, लोकवाड्.मय, आणि वचनमाला समाजाच्या संस्कारांचे, आदर्शांचे आणि जीवनदृष्टीचे प्रतीक आहेत. प्रत्येक गाणी, वचने, आणि शौर्यकथा बंजारा समाजाच्या ऐक्याचे, धैर्याचे आणि संघर्षाचे दर्शन घडवतात.

शासकीय स्तरावरही गोरमाटीला मान्यता देण्याचे प्रयत्न सुरु आहेत. तेलंगणा सरकारने प्राथमिक शाळांसाठी गोरमाटीमध्ये पाठ्यपुस्तके तयार केली आहेत. यामुळे लहान मुलांपर्यंत मातृभाषेची जाणीव पोहोचली आहे आणि त्याचा अभ्यास शक्य झाला आहे. राष्ट्रीय पातळीवरही गोरमाटी भाषेला भारतीय राज्यघटनेच्या आठव्या परिशिष्टात समाविष्ट करण्याची मागणी सातत्याने केली जात आहे. संसदेतही यावर चर्चा झाली आहे, तर अनेक विद्यापीठांमध्ये या भाषेच्या सीमांत स्थितीवर संशोधन सुरु आहे.

बंजारा बोलीभाषा तथा गोरबोली ही फक्त बोली भाषा नसून ती भारतीय लोकसंस्कृतीशी जोडलेली एक महत्त्वाची सांस्कृतिक नाळ आहे.

आधुनिक काळातील शिक्षणप्रसार, स्थलांतर, डिजिटल माध्यमे, सोशल मीडिया, इंग्रज, हिंदी व त्या त्या राज्याच्या स्थानिक प्रमाणभाषा यांच्या प्रभावामुळे ही भाषा हळूहळू लोप पावण्याच्या मार्गावर आहे. परंतु सोशल मीडियाच्या माध्यमातून बंजारा तथा गोरबोली भाषेला नवी चालना मिळत आहे, ही अत्यंत समाधानकारक बाब आहे. यामुळे युवा पिढीला मातृभाषेबद्दल जाणीव निर्माण होत आहे आणि लोकगीत, कथा, भजने, तसेच सांस्कृतिक कार्यक्रम सोशल प्लॅटफॉर्मवर सुलभतेने पोहोचत आहेत. या काळात तिचे प्रमाणीकरण, अधिकृत दर्जा मिळवणे आणि शाळा व महाविद्यालयात तिचा अभ्यास शक्य करणे हे अतिशय गरजेचे ठरते. तसेच, भाषेच्या जतनासाठी, तिच्या सौंदर्याची आणि ऐतिहासिक महत्त्वाची जाणीव समाजाला देण्यासाठी स्थानिक तसेच राष्ट्रीय पातळीवर सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक आहेत.

अखेर, बंजारा, लमाण बोली ही फक्त बोली नसून ती बंजारा समाजाच्या संस्कृतीची ओळख, त्याचा आत्मा आणि इतिहास जपणारी अमूल्य देणगी आहे. तिचे संवर्धन म्हणजे समाजाच्या मूळ ओळखीचे रक्षण करणे. ही भाषा जपली गेली, तर ती भावी पिढ्यांना त्यांच्या संस्कारांशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण माध्यम ठरेल, आणि भारताच्या सांस्कृतिक वैविध्याचे समृद्ध दर्शन घडवेल.

गोरबंजारा समाजाचे लोकवाङ्मय आजही सुरक्षित असून त्याची मौखिक परंपरा अखंडपणे जिवंत आहे. ही बोलीभाषा जिवंत ठेवण्याचे, तिच्या सुरेल लयी व आत्मीयतेला जपण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मुख्यतः तांड्यात राहणाऱ्या आमच्या गोरबंजारा माता–भगिनींनी केले आहे. गोर बंजारा तांड्यावरचा दैनंदिन जीवनक्रम असो वा सांस्कृतिक प्रसंग, या माताभगिनींच्या कंठातून वाहणाऱ्या गोरबोलीत आजही समाजाची स्मृती, संस्कृती आणि परंपरा सुरक्षित राहिलेली दिसते.

आजच्या आधुनिक काळातही, इतर भाषिक व्यक्तींशी संवाद साधताना किंवा दैनंदिन व्यवहारात सहभागी होताना, या गोरबंजारा माता–भगिनी आपल्या बंजारा गोरबोलीचा अभिमानाने वापर करताना दिसतात. बाजारहाट करताना, दैनंदिन व्यवहार करताना किंवा इतरांशी संवाद साधताना देखील त्यांच्या अभिव्यक्तीतून ही गोरबोली स्पष्टपणे प्रकट होते. अशा रीतीने, गोरबंजारा समाजाची बोलीभाषा ही केवळ संवादाचे साधन न राहता, त्यांच्या सांस्कृतिक अस्तित्वाची व अस्मितेची जिवंत साक्ष ठरते.

आजमितीला भारतात गोर बंजारा समाज तसेच गोरबोली बोलणाऱ्यांची संख्या सुमारे बारा कोटींच्या आसपास असल्याचा अंदाज काही अभ्यासकांकडून व्यक्त केला जातो. इंग्रजांच्या आगमनानंतर गोर बंजारा समाजाचा पारंपरिक ‘लदेणी’ (फिरस्ता व्यापार) व्यवसाय हळूहळू बंद पडला. या ऐतिहासिक बदलांमुळे हा समाज देशाच्या विविध भागांत पसरला; तरीही, वेगवेगळ्या प्रदेशांत राहू लागला असतानाही आपली मूलभूत बोलीभाषा त्यांनी निष्ठेने जपली.

काळाच्या ओघात आणि प्रादेशिक प्रभावांमुळे या बोलीला विविध नावे प्राप्त झाली आहेत. देशाच्या वेगवेगळ्या भागांत ती बंजारी, गोरबोली, गोरमाटी बोली, लमाण बोली, ब्रिजारी, लभाणी, लंबाडी, राठौडी तांडाभाषा इत्यादी अशा अनेकविध नावांनी ओळखली जाते. नावांत भिन्नता आढळून येत असली, तरी भाषेची अंतर्गत रचना, तिचा सांस्कृतिक आशय आणि अभिव्यक्तीचा मूलस्वरूप आत्मा मात्र सर्वत्र मोठ्या प्रमाणात समान राहिलेला दिसून येतो, हे विशेष आहे.

आज कित्येक शतके उलटून गेली तरीही गोरबंजारा समाजाच्या दैनंदिन जीवनातील संवादाचे, सामाजिक संबंधांचे आणि सांस्कृतिक सातत्याचे प्रमुख

साधन म्हणून बंजारा गोरबोलीचे स्थान अबाधित राहिले आहे. ही बोलीभाषा केवळ संवादाचे माध्यम नसून, ती गोर बंजारा समाजाच्या इतिहासाची साक्ष, संस्कृती, स्मृतींचे भांडार आणि अस्मितेचे प्रभावी प्रतीक म्हणून आजही जिवंत आहे.

आंतरराष्ट्रीय भाषावैज्ञानिकांच्या मते, सध्या जगभरात सुमारे ७,१६८ जिवंत भाषा अस्तित्वात असल्या तरी, त्यातील बहुतांश भाषांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. युनेस्को (UNESCO) आणि 'एथ्नोलॉग'च्या आकडेवारीनुसार, जगातील सुमारे ४०% ते ५०% भाषा या शतकाच्या अखेरीस लुप्त होण्याची भीती आहे; कारण या भाषांचे पुढच्या पिढीकडे होणारे नैसर्गिक हस्तांतरण थांबले आहे. जागतिकीकरण, आर्थिक गरजा आणि वाढत्या शहरीकरणामुळे लोक आपली स्थानिक बोलीभाषा बाजूला ठेवून प्रमुख संपर्क भाषांकडे वळत आहेत. शिक्षण, रोजगार, अधिक व्यापक सामाजिक आणि व्यावसायिक संधी या संदर्भात इंग्रजी किंवा राष्ट्रीय भाषांचे प्रशिक्षण आणि वापर वाढल्यामुळे अनेक लहान समुदायांची पारंपरिक बोलीभाषा दिवसेंदिवस दुर्लक्षित होत आहेत. विशेषतः डिजिटल तंत्रज्ञानाच्या युगात ज्या भाषा इंटरनेट, सॉफ्टवेअर किंवा ऑनलाईन माध्यमांवर उपलब्ध नाहीत, त्या मुख्य प्रवाहातून मागे पडल्या आहेत.

भाषा टिकवणे म्हणजे केवळ भाषाशास्त्रीय रूपे जपणे नाही, तर संबंधित समुदायांची सांस्कृतिक, सामाजिक आणि ऐतिहासिक ओळख संरक्षित करणे देखील आहे. जेव्हा एखादी भाषा लुप्त होते, तेव्हा त्यामागील त्याची पारंपरिक ज्ञानव्यवस्था, लोकसाहित्य, संस्कृती, धार्मिक आचार, सामाजिक परंपरा आणि विशिष्ट जगण्याची पद्धत देखील लोप पावते, हा एक सांस्कृतिक धोक्याचा गंभीर मुद्दा आहे.

या पार्श्वभूमीत, जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावर भाषा संरक्षण, दस्तऐवजीकरण, आणि पुनर्बहालीच्या उपक्रमांना मोठे महत्त्व दिले जात आहे. UNESCO तसेच अनेक शैक्षणिक संस्था लुप्तप्राय भाषांचे ऑडिओ-व्हिडिओ अभिलेखन, व्याकरणात्मक उदाहरणे, शब्दकोश, शैक्षणिक पाठ्यक्रम आणि डिजिटल संदर्भ उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नात आहेत. या सर्व प्रयत्नांचा मुख्य उद्देश ही भाषिक विविधता पुढील पिढ्यांपर्यंत टिकवून ठेवणे आणि मानवी सांस्कृतिक वारशाचे संरक्षण सुनिश्चित करणे हा आहे.

**२. बंजारा / गोरबोली भाषेचा क्षेत्रविस्तार:**

बंजारा किंवा गोरबोली ही भारतातील इंडो-आर्यन (आर्य) भाषाकुटुंबातील एक अत्यंत समृद्ध आणि व्यापक विस्तार असलेली बोलीभाषा आहे. ऐतिहासिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या या भाषेचा विस्तार उत्तर, मध्य आणि दक्षिण भारताच्या विस्तीर्ण भौगोलिक प्रदेशात आढळतो. ही भाषा केवळ संवादाचे माध्यम नसून, ती गोरबंजारा समाजाच्या वैभवशाली वारशाची आणि ओळखीचा मुख्य कणा आहे.

राजस्थानच्या मारवाडी आणि गुजराती भाषेशी जवळचे नाते असणारी ही भाषा गोरबंजारा समाजाच्या ऐतिहासिक स्थलांतरामुळे देशभर पसरली. स्थानिक भौगोलिक प्रभाव आणि भाषिक वैशिष्ट्यांनुसार या विस्ताराचे प्रामुख्याने दोन भाग पडतात :

**अ) इंडो-आर्यन भाषा प्रांत : (उत्तर व मध्य भारत) :**

या प्रदेशात गोरबोलीचे मूळ राहिले असून, येथील स्थानिक भाषांशी तिचे भाषिक साधर्म्य अधिक आहे.

**समाविष्ट राज्ये:** राजस्थान (मूळ उगम), गुजरात, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, दिल्ली, हिमाचल प्रदेश, बिहार, झारखंड, ओडिशा आणि पश्चिम बंगाल.

**वैशिष्ट्ये:** या भागात ही भाषा 'गोरबोली' म्हणून प्रामुख्याने ओळखली जाते. महाराष्ट्रातील तांड्यांमध्ये ही भाषा आजही तिच्या मूळ स्वरूपात जिवंत आहे.

**आ) द्रविड भाषा प्रांत : (दक्षिण भारत):**

ऐतिहासिक व्यापाराच्या आणि लष्करी मोहिमांच्या निमित्ताने हा समाज दक्षिण भारतात स्थिरावला, तरीही त्यांनी आपले भाषिक वेगळेपण जपले आहे.

**समाविष्ट राज्ये:** तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक, तमिळनाडू, केरळ आणि गोवा.

**वैशिष्ट्ये:** दक्षिण भारतात या भाषेला 'लंबाडी' किंवा 'लमाणी' या नावांनी अधिक ओळखले जाते. येथे द्रविड भाषांचा (उदा. तेलगू, कन्नड) काही प्रमाणात शब्दकोशीय प्रभाव जाणवतो, मात्र भाषेची मूळ संरचना आर्यकुळातीलच राहिली आहे.

बंजारा किंवा गोरबोली ही भारतातील विखुरलेल्या गोरबंजारा समुदायाला जोडणारा एक भक्कम दुवा आहे. विविध प्रांतांमधील स्थानिक जीवनशैली, व्यवहार आणि समाजसंरचना यांच्याशी ती घट्ट विणली गेली असून, आजही समाजजीवनात ती जिवंत स्वरूपात टिकून आहे. या भाषेचा विस्तार हा भारताच्या 'विविधतेत एकता' या सूत्राचे एक उत्तम उदाहरण आहे.

**३) बंजारा / गोरबोली : भाषिक विविधता आणि लेखन पद्धती :**

बंजारा किंवा गोरबोली ही भाषा तिच्या भौगोलिक विस्तारामुळे आणि विविध प्रांतांतील वास्तव्यामुळे अनेक नावांनी ओळखली जाते. ही केवळ नावे नसून, ती त्या त्या प्रदेशातील संस्कृती आणि समाजजीवनाशी असलेल्या संबंधांची प्रतीके आहेत.

**४) भाषेची पर्यायी आणि प्रादेशिक नावे:**

गोरबोलीला विविध राज्यांत आणि समुदायांत खालीलप्रमाणे ओळखले जाते :

समुदाय-आधारित नावे: गोरमाटी, गोरबोली, तांडाभाषा, राठौडी.

प्रादेशिक उच्चारभेद: बंजारा, बंजारी, बंजोरी, बंजूरी, ब्रिजारी, बंगाला.

दक्षिण भारतातील प्रचलित नावे: लभाणी, लम्हाणी, लंबाडी, लमाणी, लंबारा, लवाणी, लेमाडी.

इतर स्थानिक नावे: वंजारी, सिंगाळी, सुगाळी, सुकळी.

या विविध नावांवरून हे स्पष्ट होते की, ही भाषा भारताच्या एका विशाल भूभागावर स्थानिक लोकजीवनाशी समरस झाली आहे.

**५) लेखन पद्धती आणि लिपी (Script and Writing Systems):**

गोरबोली ही मूलतः मौखिक परंपरा असलेली भाषा असली तरी, आधुनिक काळात तिच्या संवर्धनासाठी विविध प्रादेशिक लिपींचा वापर केला जातो. समाजाच्या भौगोलिक विस्तारानुसार या भाषेचे लेखन पुढीलप्रमाणे होते:

महाराष्ट्र आणि उत्तर भारत: प्रामुख्याने देवनागरी लिपीचा वापर केला जातो. महाराष्ट्रात गोरबोलीचे बहुतांश साहित्य आणि प्रमाण लेखन देवनागरीतच आढळते.

कर्नाटक: येथील बंजारा समाज (लमाणी) आपली भाषा लिहिण्यासाठी कन्नड लिपीचा वापर करतो.

तेलंगणा आणि आंध्र प्रदेश: या राज्यांमध्ये लंबाडी भाषा तेलगू लिपीमध्ये लिहिली जाते.

इतर प्रांत : ज्या ज्या राज्यांमध्ये बंजारा समाज स्थायिक आहे, तेथील अधिकृत प्रादेशिक लिपी (उदा. गुजरातमध्ये गुजराती, ओडिशामध्ये ओडिया) लेखनासाठी स्वीकारली जाते.

**६) भाषिक समृद्धी आणि विशेष वैशिष्ट्ये:**

गोरबोलीची स्वतःची स्वतंत्र व्याकरणिक रचना आहे. जरी लेखनासाठी विविध लिपींचा वापर होत असला, तरी या भाषेचा 'गाभा' (Core) आणि 'ध्वनी' (Phonetics) सर्वत्र समान आहे. यामुळेच काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंतचा बंजारा समाज या एकाच भाषेच्या माध्यमातून एकमेकांशी संवाद साधू शकतो. ही भाषा आज 'डिजिटल' युगात स्वतःची ओळख टिकवून असून, तिच्या संवर्धनासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरही प्रयत्न सुरू आहेत.

आजमितीस देशात बंजारा बोलीभाषिकांची लोकसंख्या सुमारे दहा कोटींच्या आसपास असतानाही बंजारा बोलीला अद्याप स्वतंत्र भाषेचा दर्जा मिळालेला नाही. बंजारा बोलीच्या संवर्धनासाठी तिला अंतर्गत व्यवहारात स्थान मिळणे अत्यावश्यक आहे. बंजारा भाषेतील ग्रंथ, पाठ्यपुस्तके आणि संदर्भ साहित्य देवनागरी लिपीत तयार होणे आवश्यक आहे. शासनाकडून बंजारा बोलीला संस्थात्मक आधार मिळाल्यास तिचा वापर दैनंदिन व्यवहारात वाढेल आणि संवर्धनास चालना मिळेल. विविध शासकीय उपक्रमांमुळे बंजारा बोली बोलणाऱ्या व जाणणाऱ्या लोकांची संख्या वाढत राहील.

देवनागरी लिपीचा वापर करून बंजारा बोली प्रभावीपणे लिहिता येते. बंजारा बोलीचा विस्तृत अभ्यास केल्यास ती एक स्वतंत्र, स्वयंपूर्ण बोली असल्याचे स्पष्ट होते. बंजारा बोलीचा स्वतःचा वैशिष्ट्यपूर्ण शब्दसंग्रह असून, त्यातील अनेक शब्द अन्य कोणत्याही भाषेत आढळत नाहीत.

पूर्वीच्या काळी बंजारा समाज सतत स्थलांतर करीत असल्याने तो देशभर विखुरलेला होता. त्यामुळे बंजारा बोलीचे कोणतेही एक निश्चित प्रमुख केंद्र ठरविता येत नाही. जरी बंजारा बोलीत काही प्रमाणात प्रांतिक भेद आढळत असले, तरी तिचा मूळ भाषिक गाभा संपूर्ण देशात समान आहे. भारतातील कोणत्याही प्रदेशात बंजारा समाजातील लोक परस्पर बंजारा बोलीत संवाद साधताना भाषिक अडथळा येत नाही.

भारत सरकारच्या जनगणना सर्वेक्षणात बंजारा बोलीच्या नोंदीबाबत मोठ्या प्रमाणात गोंधळ झाल्याचे दिसून येते. याचे मुख्य कारण म्हणजे बंजारा समाज भारतातील विविध प्रांतांमध्ये ३० ते ३५ वेगवेगळ्या नावांनी ओळखला जातो. त्याचप्रमाणे बंजारा बोलीलाही प्रदेशपरत्वे बंजारी, लमाणी, लबांडी, सुगाळी, लबाणी, ब्रिंजारी, पोवारी, राठौडी इत्यादी भिन्न नावे दिली जातात. जनगणना अर्जांमध्ये या विविध नावांची स्वतंत्र नोंद होत असल्याने देशपातळीवरील गोरबोली भाषिकांची नेमकी संख्या निश्चित करणे अवघड झाले आहे.

**७. बंजारा बोलीचे व्याकरणिक विशेष :**

बंजारा बोलीचा भाषाशास्त्रीय दृष्टीने विचार केल्यास पुढील प्रमाणे काही खास व्याकरणिक विशेष दिसून येतात.

**३) महाप्राण व कठोर उच्चाराचे अधिक्य आढळते.**

उदाहरणार्थ – ख, ग, घ, छ, ध, ढ, ह, ळ.

जसे – खानदान (घराणे), डूंगर (डोंगर), डोकरा (म्हातारा), घणो (अधिक), गव्हाणे (गाऱ्हाणे), धोळो (सफेद), हाहाकार, हाकार (बोलावणे), ढोकळा, ढालिया (डफाच्या तालावर नृत्य करणारा मागत्या) खेकडो (खेकडा) इत्यादी.

**४) मूर्धन्य वर्णांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो.**

उदा. ट, ठ, ड, ढ इत्यादी मूर्धन्य वर्णीचे अधिक्य आढळते. जसे – टोकणो (पाण्याचा हंडा), डूंगर (डोंगर), ठालोपालो (रिकाम्या हाताने), टेकडा (टेकडी), तांडरो (माणूस) इत्यादी.

**५) अनुस्वारांचे प्राबल्य अधिक आढळते.**

जसे – कांई (काय), कुंण (कोण), तांडरी (बायको), ओंदून (त्यांना), आपण (आपण), कुंण (कोण) कुंणसो (कोणता), पाणी (पाणी), लुंण (मीठ), घराणे (घराणे), गोळणी (बायको), जेवणं (जेवण), नंगावण (कालवण), आंगळी (बोट), बाफंणी (भुवई) इत्यादी.

**६) 'ळ' या व्यंजनाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो.**

जसे – गेळो (अलंकार), पामंळी (पाहुणी), बाफंळी (भुवई), कोळ (घास), उंधाळो (उन्हाळा), दनवंळा (दिवसा), काचळी (चोळी), थाळी (परात), कचोळी (वाटी), धोळो (सफेद, पांढरा) इत्यादी.

**७) 'ओ' कारान्त उच्चाराचे प्रमाण अधिक दिसते.**

जसे – धोळो (सफेद), काळो (काळा), गळो (गळा), आटो (पीठ), मिठो (गोड), बेसणो (बसणे), उंडो (खोल), छरो (सुरा), खाटो (आंबट), चरको (तिखट), वरसाळो (पावसाळा) इत्यादी.

**८) जोडशब्दांचा वापर अधिक प्रमाणात होतो.**

जसे – खेतीवाडी (शेतीवाडी), पामंणरावंण (पाहुणे-राऊळे), रीतभात, खरोखोटो (खरे-खोटे), आंणोजांणो (येणे-जाणे), कपडालत्ता, ढोरधांडो (गुरे-ढोरे), उंधाळो-वरसाळो (उन्हाळा-पावसाळा), वायानातरा (लग्न सराई), कामधंदो (कामधंदा), उठणो- बेसणो (उठणे-बसणे), नानक्या-मोठो (लहान-मोठा) इत्यादी.

**९) नासिक्य उच्चाराचे प्रमाण अधिक आढळते.**

जसे – छैंणी (नाही), तोनं (तुला), मनं (मला), हामनेनं (आम्हाला), झोंळणी (रवी) इत्यादी.

**१०)कंठ्य वर्णांचे उच्चार नासिक्य स्वरुपात होतांना दिसतात.**

जसे – कन्ह (जवळ), गामेमं (गावात), घणो (खूप), घंणदूर (दूर अंतरावर) कुंण (कोण), कन्हां (केव्हा), घंणम् (दूर), हामनेनं (आम्हाला), हंगोळी (आंघोळ) इत्यादी.

**११)संभाषणात अरे – तुरे शब्दांचा वापर जास्त प्रमाणात आढळतो.**

जसे – तू, तोरो (तुझा), मारो (माझा), केरो (कोणाचा) मनं (मला), तोनं (तुला) हमारो (आमचा) तमारो (तुमचा) इत्यादी.

उदा. 'तू कत जारो छी?' (तू कुठे चाललास?)

'तू कांई कर रो छी?' (तू काय करतोस?)

'तारो नाम कांई छ?' (तुझे नाव काय आहे?)

'तू कांई केरो छी?' (तू काय म्हणतोस?)

**बंजारा बोली एक स्वतंत्र बोली :**

बंजारा बोलीचा स्वतःचा खास करून स्वतंत्र शब्दसंग्रह आढळतो. बंजारा बोलीत हिंदी, मारवाडी, गुजराती, राजस्थानी, मेवाडी इत्यादी भाषेच्या वळणाचे काही शब्द आढळत असले तरी बंजारा बोलीतील खास करून अनेक शब्द असे आहेत की, जे अन्य कोणत्याही भाषेत आढळत नाहीत. यासंबंधी काही उदाहरणे –

१) **मानवी अवयवांची नावे :**

जसे – डील (अंग), हिवो (छाती), खवो (खांदा), गोडो (गुडघा), ढांकंणी (गुडघ्याची वाटी), चट्टी आंगळी (करंगळी), लटा (केस), पुठो (पाठ) इत्यादी.

**२) पोशाखा संबंधी शब्द :**

**स्त्री पोशाख** – काचळी (चोळी), फेटीया (लेहंगा), पांबडी (ओढणी) इत्यादी.

**पुरुष पोशाख** – झगला (शर्ट), गुडगी जांगिया (अंडर वियर) इत्यादी.

**३) अलंकारासंबंधी शब्द :**

**स्त्री अलंकार** – चोटला (कान शिळावर केसात लटकता बांधतात तो स्त्री अलंकार), भूरिया (मोठी नथ), आठी (पाठीवर बांधावयाचा विशिष्ट प्रकारचा वस्त्र अलंकार), आंगुतळा (पायाच्या बोटातील अलंकार) इत्यादी.

**पुरुष अलंकार** – कल्डा (कडे), मरकी (कानातील बाळी), कंदोरो (कमरेला बांधावयाची चांदीची साखळी) इत्यादी.

**४) आहारासंबंधी शब्द :**

बाटी (भाकरी), बोटी (मटण), खोडी (चटणी), जामंण (ताक), लापड (चपाती), सळोई (बिर्याणी), इत्यादी.

**५) नातेदर्शक शब्द :**

धंणी (नवरा), गोळणी (बायको), नवलेरी (नवरी), वेतडू (नवरदेव), याडी (आई), वडारी (भाया), भीया (भाऊ), बोढी (सून), नळंदोई (नणंदेचा नवरा), तांडरी (बाई), तांडरो (माणूस), छोरा (मुलगा) इत्यादी.

**६) भांडीदर्शक शब्द :**

कचोळी (वाटी) घडीया (घागर), टोकंणो (पाण्याचा हंडा), भगोना (पातेले), घटी (जाते) ओल्डी (टोपली) इत्यादी.

**७) अन्य शब्द :**

सुवो (दाभण), ढेरो (सूत कातण्याचे साधन), बळद (बैल), गावडी (गाय), केल्डा (वासरु), धांद (रस्सी, दोरी), सुवांणी (पुन्या), चरको (तिखट) इत्यादी.

**मराठी भाषा आणि बंजारा भाषा तुलनात्मक सारणी (Quick Glance)**

| वैशिष्ट्य | मराठी भाषा | बंजारा बोलीभाषा |
|---|---|---|
| **लिंग व्यवस्था** | पुल्लिंग, स्त्रीलिंग, नपुंसकलिंग | केवळ पुल्लिंगी आणि स्त्रिलिंग |
| **व्यंजन** | श, ष, स ही तिन्ही व्यंजने स्वतंत्र | श, ष, स साठी प्रामुख्याने 'स' चा वापर |
| **विभक्ती प्रत्यय** | प्रथमेला प्रत्यय नसतो. | क्वचित प्रसंगी प्रथमेलाही प्रत्यय आढळतात. |
| **षष्ठी प्रत्यय** | चा, ची, चे, च्या | रो, री, रं, रा |
| **प्रभाव** | संस्कृत, प्राकृत | राजस्थानी, मारवाडी, माळवी, नेमाडी |

**बंजारा – गोरबोलीची सद्य:स्थिती :**

भाषा ही समाजाच्या विचार-अभिव्यक्तीचे मूलभूत माध्यम आहे. बंजारा समाजाची गोरबोली ही त्यांच्या सांस्कृतिक एकात्मतेची ओळख असून, बदलत्या काळातही ती प्रामुख्याने तांडा व्यवस्थेमुळे टिकून राहिली आहे. नागरी संस्कृतीपासून अलिप्त राहिल्याने गोरबोलीचा नैसर्गिक प्रवाह अबाधित राहिला.

बंजारा बोली जतन करण्यात तांड्यातील माता-भगिनी, भजनी मंडळे आणि लोकवाङ्मयाचे मोठे योगदान आहे. लोकगीते, कथा, म्हणी व वाक्प्रचार आजही बोलीत सुरक्षित आहेत. अलीकडे बंजारा समाजातून लेखक, अभ्यासक पुढे येत असून साहित्यनिर्मिती, नियतकालिके व संकेतस्थळांद्वारे बंजारा बोलीला नवे व्यासपीठ मिळत आहे.

भौगोलिक भागानुसार बंजारा बोलीवर स्थानिक भाषांचा परिणाम दिसतो. दक्षिण भारत व महाराष्ट्रात मूळ बोली मोठ्या प्रमाणात सुरक्षित आहे; तर उत्तर भारतात हिंदीच्या प्रभावामुळे बंजारा बोलीचे अस्तित्व मर्यादित होत चालले आहे. ग्रामीण भागात बोली टिकून असली तरी शहरी व सुशिक्षित नव्या पिढीत तिचा वापर कमी होत आहे.

राष्ट्रीय पातळीवर साहित्य संमेलने, अधिवेशने व संघटनांच्या कार्यामुळे बंजारा बोलीच्या संवर्धनाची चळवळ सुरू आहे. तरीही भविष्यात शहरी बंजारा पिढी बंजारा बोली आत्मसात करेल की नाही, हा प्रश्न गंभीर व चिंताजनक ठरतो.

**निष्कर्ष (Conclusion):**

बंजारा / गोरबोली ही इंडो-आर्यन भाषाकुटुंबातील स्वतंत्र, प्राचीन आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध बोलीभाषा आहे. ही भाषा गोरबंजारा समाजाच्या इतिहास, परंपरा, लोककला आणि जीवनमूल्यांची जिवंत साक्ष आहे. भौगोलिक विस्तारामुळे प्रादेशिक भाषांचा प्रभाव जाणवतो, तरीही तिचा मूळ व्याकरण आणि शब्दसंग्रह अखंड आहे. बंजारा बोली मौखिक परंपरेत समृद्ध असून लोकगीते, भजने आणि कथांमधून पीढ्यान्पीढ्या जपली गेली आहे. लेखनासाठी प्रामुख्याने देवनागरी लिपीचा वापर केला जातो, तर काही दक्षिण भारतीय प्रांतांत स्थानिक लिपी वापरली जाते.

आजही बंजारा समाजाने आपली बोलीभाषा जपली आहे; मात्र शिक्षण, डिजिटल माध्यमे आणि बहुभाषिक संवादामुळे तिचे हळूहळू लोपाचे धोके आहेत. त्यासाठी सामाजिक, शैक्षणिक आणि संस्थात्मक पातळीवर संरक्षण, दस्तऐवजीकरण आणि संवर्धन आवश्यक आहे. बंजारा बोली जपल्यास ती भावी पिढ्यांना संस्कृतीशी जोडणारे महत्त्वपूर्ण माध्यम ठरेल आणि भारतीय भाषिक-सांस्कृतिक वैविध्याचा संपन्न दर्शन घडवेल.

**उपसंहार :**

बंजारा बोली ही बंजारा समाजाची लोकभाषा व मातृभाषा असून ती पूर्णतः स्वाभाविक, प्रवाही व सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध आहे. प्रमाण भाषा व बोली यांमध्ये शुद्ध-अशुद्ध असा भेद नसून दोन्हींचे स्वतंत्र सामाजिक व भाषिक महत्त्व आहे. बंजारा बोलीची निर्मिती ऐतिहासिक, भौगोलिक व सामाजिक कारणांतून झाली असून ती संस्कृत–प्राकृत–अपभ्रंश परंपरेशी संबंधित आहे.

बंजारा बोली ही अलिखित असल्याने तिचा अभ्यास लोकसाहित्य, म्हणी, वाक्प्रचार, लोकगीते यांच्या आधारे करण्यात आला आहे. तिची स्वतंत्र स्वर-व्यंजन व्यवस्था, उच्चारण वैशिष्ट्ये, लिंगभेदक उच्चारण, काळानुसार क्रियापद रूपे व विशिष्ट वाक्यरचना आढळते. बंजारा बोलीत नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, अव्यये, परसर्ग, पदबंध व वाक्यविचार यांची सुसंगत व संपूर्ण व्याकरणिक व्यवस्था आहे.

राजस्थानी, निमाडी, मारवाडी, हिंदी व मराठी भाषांचा काही प्रमाणात प्रभाव दिसून येतो; तथापि बंजारा बोलीचे स्वतंत्र भाषिक अस्तित्व अबाधित आहे. लोकगीतांतील अलंकारिक भाषा, पुनरुक्ती, लकबी व व्याकरणिक रचना ही गोर बोलीची वैशिष्ट्ये आहेत.

वरील विविध उदाहरणांवरून गोरबोली ही एक स्वतंत्र बोली असल्याचे स्पष्ट होते. संपूर्ण भारतात विखुरलेल्या गोर-बंजारा समाजाची बंजारा बोली ही एक प्राचीन बोलीभाषा आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही आपल्या आगळ्यावेगळ्या वैशिष्ट्यांमुळे आपले स्थान टिकवून आहे. बंजारा बोली ही एक स्वतंत्र बोली असून स्वतःचा खास करून स्वतंत्र शब्दसंग्रह आहे. त्यातील बहुतांश शब्द अन्य कोणत्याही भाषेत आढळत नाहीत. उच्चारण्यास काहीशी मृदू, मवाळ, लवचिक व काहीशी रांगडी, कठोर अशी एक वैशिष्ट्यपूर्ण बोली आहे. बंजारा बोलीचा भाषाशास्त्रीय दृष्टिकोनातून सखोल अभ्यास होऊन बंजारा बोलीचे जतन व संवर्धन होणे गरजेचे आहे असे वाटते.

**संदर्भ सूची :**

१. शर्मा श्रीराम, (१९९३). 'बंजारा समाज', प्रिंटर्स मुद्रणालय, हैदराबाद

२. आर्य आर. रमेश, (२००२). 'बंजारा भाषा अपणे आप शिख,' बंजारा प्रकाशन, हैदराबाद

३. राठोड मोतीराज, (२००३).'गोर बंजारा जन-जाती का इतिहास,' विद्या प्रकाशन, गुजैनी, कानपूर

४. राठोड सुभाष, (२०१६).'बंजारा समाज : गोर बोली आणि मौखिक वाङ्मय,' राष्ट्रीय बंजारा परिषद

५. https://shodhganga.inflibnet.ac.in

६. www.banjarasamaj.com